महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

CIN : U40109MH2005SGC153646

अधिक्षक अभियंता (स्थापत्य),
अउदा स्थापत्य बांधकाम नि. सुव्यवस्था मंडल, ऐरोली,
ब्रम्हपुत्रा बिल्डिंग, पहिला मजला, ठाणे–बेलापुर मार्ग
म.रा.वि.पा.कं.मर्या.संकुल. ऐरोली नवी मुंबई–४०० ७०८
☎ ०२२–२७६०१६२१(वै)२७६०१६२२(का)

e-mail- se7700@mahatransco.in website:- www.mahatransco.in

संदर्भ क्र. अअस्था/अउदा स्था.बां.नि.सु.मं./ऐरोली/तांत्रिक/७२७ दिनांक : १५.०६.२०१९

विषय :– सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता अंतर्गत वर्ग ५ यांना नोंदणी प्रमाणपत्राचे व लॉटरी पध्दतीने कामे वाटप करण्यासंबंधी प्रथम लॉटरी (२०१८–१९) बैठक दि. २०.०६.२०१९ (गुरूवारी) ला घेणेबाबत.

संदर्भ :– १. I, E&L Dept. GoM GR No. Misc.-2015/CR-63/Energy-5 Dtd. 26.03.2015.
२. MSETCL/CO/Tr.O&M/SE-II/EE-VIII/12883 dtd. 05.12.2016.
३. C.O. Letter vide No. 1046 dtd. 25.01.2018.

सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्थापत्य) यांना विनास्पर्धा थेट लॉटरी पध्दतीने कामे वाटपाची योजना महाराष्ट्र शासनाच्या निर्णय संदर्भ कं. (१) अन्वये अधीन राहून महापारेषण कंपनीने संदर्भ क्रं. (२) अन्वये लागू केली आहे.

सदरील नोटीस ही दि. १५.०६.२०१९ रोजी प्रसिध्दीस देण्यात येत असून प्रसिध्दीच्या दिनांकापासून २०.०६.२०१९ पर्यंत महापारेषण कंपनीच्या संकेतस्थळावर तसेच अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, ऐरोली या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्दीस्तव उपलब्ध असेल.

या योजने अंतर्गत अधिक्षक अभियंता (स्था) अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, ऐरोली या कार्यालयात दि. २०.०६.२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता खालील कामांसाठी खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम लॉटरी (२०१९–२०) बैठक आयोजित करण्यात येत आहे.

| अ. कं. | कामाचे नाव | रक्कम (सर्व करासहित) | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | Annual civil maintenance works of colonies at 100KV Mohane, 100KV Shahpur, 100KV Murbad for FY 2019-20 | 9,97,789.20 | ठाणे |
| २ | Annual civil maintenance of Kharghar colony at 400KV S/stn Kharghar (Dist. Raigad) for FY 2019-20 | 5,28,810.80 | रायगड |
| ३ | Annual civil maintenance works of colonies at Mahad/Mhasala/Roha, Dist. Raigad for FY 2019-20 | 5,02,566.45 | रायगड |

अटी व शर्ती:–

१) सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांनी लॉटरीसाठी उपस्थित राहताना खालील तपशील सोबत आणणे बंधनकारक आहे.

अ. महाराष्ट्र शासनाची स्थापत्य कामासाठीची वैध अनुज्ञाप्ती.

ब. सर्व शासकीय /निमशासकीय/खाजगी आस्थापनेमध्ये एकूण केलेल्या व चालू असलेल्या कामाचा तपशील.

क. रहिवासी प्रमाणपत्र व सर्व मूळ कागदपत्रे.

२) संबंधित अधिक्षक अभियंता यांच्या कार्यक्षेत्रात रहिवासी असलेल्या बेरोजगार अभियंत्याला लॉटरीमध्ये सहभाग घेता येईल. कार्यक्षेत्राबाहेरील बेरोजगार अभियंता लॉटरीमध्ये सहभाग घेऊ शकणार नाही.

३) ही सवलत अभियांत्रिकी पदवी / पदविका उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या आत नोंदणी केलेल्या सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना (विद्युत व स्थापत्य) लागू होईल. लॉटरी पध्दतीने कामे वाटपाच्या वेळेस सदर स्थापत्य अभियंता हा सुशिक्षित बेरोजगार असावा तसेच तो कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेत नसावा. उपस्थित असलेल्या सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंत्याने दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास त्याला महापारेषण कंपनीने प्रदान केलेला नोंदणीकृत परवाना रद्द करण्यात येईल, तसेच महापारेषण कंपनीने या योजनेंतर्गत काढलेल्या पुढील कोणत्याही लॉटरी प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही व सदर अभियंत्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

४) या लॉटरी प्रक्रियेसाठी अधिक्षक अभियंता (स्था) अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, ऐरोली या कार्यालयात दि. १५.०६.२०१९ नोंदणी झालेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील.

सदर लॉटरी बैठक दि. २०.०६.२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता अउदा स्थापत्य बांधकाम नि. सुव्यवस्था मंडल, ऐरोली, ब्रम्हपुत्रा बिल्डिंग, पहिला मजला, ठाणे–बेलापुर मार्ग म.रा.वि.पा.कं.मर्या.संकुल. ऐरोलीया कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. वरील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणा–या वैध सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांना आव्हान करण्यात येते की, त्यांनी नियोजित वेळेस कागदपत्राच्या सत्य प्रत सोबत या कार्यालयात उपस्थित राहावे.

(भू. इ. बल्लाळ)
अधिक्षक अभियंता (स्था.)
अउदा स्था.बां. नि सु. मंडल, ऐरोली

प्रत सादर:–

१. कार्यकारी अभियंता (प्रशा), अउदा स्था.बां. नि सु. मंडल, ऐरोली.
२. कार्यकारी अभियंता (स्था), अउदा स्था.बां. नि सु. विभाग, पनवेल.
वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या समिती सदस्यासोबत नियोजित वेळेत या कार्यालयात उपस्थित राहावे.
३. व्यवस्थापक (विवले) अउदा स्था.बां. नि सु. मंडल, ऐरोली
४. अति. कार्यकारी अभियंता (स्था), अउदा स्था.बां. नि सु. उपविभाग कल्याण , खारघर
वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या समिती सदस्यासोबत नियोजित वेळेत या कार्यालयात उपस्थित राहावे.
५. नोटीस बोर्ड.